ISSN 2278-8808 IMPACT FACTOR: 1.38
An International Peer Reviewed
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# स्त्री भ्रूण हत्या प्रतिबंधाच्या सद्यस्थितीबाबत शिक्षणाची भूमिका : एक अभ्यास

**डॉ. जयश्री आयरेकर, (प्राचार्य)**

*भिमाशंकरशिक्षणशास्त्र महाविद्यालय, लांडेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे.*

**Abstract**

*प्राचीन काळातील विदुषीपासूनते राणी लक्ष्मीबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले ते अलीकडच्या काळातील प्रतिभाताई पाटील, सुनिता विल्यम्स, मेरी कोम, लता मंगेशकर अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांनी आपल्या कर्तृत्त्वाची चुणूक जगाला दाखवून दिली आहे. असे असतानाही देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल ढासळतो आहे ही चिंतेची बाब आहे. राज्याच्या २००२ च्या मानव विकास अहवालाप्रमाणे आपल्याला 'मुलगाच हवा' ही भावना महाराष्ट्रात प्रबळ आहे. अभ्यासाअंती या अहवालात २७ टक्के महिलांना मुलींपेक्षा मुलगेच हवे असल्याचे तर ८४ टक्के महिलांना आपल्याला केवळ मुलगा असावा असं वाटत असल्याचं नमुद करण्यात आले. संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती. संशोधनाद्वारे महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराबाबतची वस्तुस्थिती अभ्यासणे. संशोधनाद्वारे स्त्री-भ्रूण हत्या रोखण्याबाबत शासनाने केलेले प्रयत्न व कायदे अभ्यासणे. संशोधनाद्वारे स्त्री-भ्रूण हत्या रोखण्याबाबत शिक्षणाची भूमिका अभ्यासणे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने गुणात्मक संशोधनातील दस्ताऐवज पृथःकरण पद्धतीचा अवलंब केला आहे. स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधनाबाबत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाचे अहवाल, महिला व बालविकास विभागाचा अहवाल, आरोग्य विभागाच अहवाल, कायदा व सामाजिक न्याय विभागाचा अहवाल, Census Report, शासकीय संकेतस्थळांवरील माहिती, विविध पुस्तके, मासिके व नियतकालीके यांचा माहिती संकलनाची साधने म्हणून उपयोग करण्यातआला आहे. महाराष्ट्र शासनाने देशात पहिल्यांदा १९९४ साली महिला धोरणाची अंमलबजावणी केली. २००१ मध्ये नवीन महिला धोरण तयारकरण्याच्याकामाला वेगआला. महिलांना आर्थिक तसेच सामाजिक दृष्ट्या सक्षम बनविल्यास त्यांना समाजात मानसन्मान आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्यास या समस्येवर प्रभावीपणे मात करता येईल. महिला सक्षमीकरणाचे अनेक मार्ग शासनाने उपलब्ध केले आहेत. स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदा आहे. शिक्षेची तरतूद आहे. या कायद्यान्वये सोनोग्राफी आणि गर्भपात केंद्रावर बंधने घालण्यात आली. कायद्याची कडक अंमलबजावणी केल्याशिवाय स्त्री-भ्रूण हत्या थांबणार नाही. त्या जोडीला समाजाची मानसिकता बदलण्यासाठीही प्रयत्न हेताना दिसून आहेत. शासनासोबतच अनेक स्वयंसेवी संस्था सक्रियपणे याला पाठींबा देताना दिसून येतात. स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंध शिक्षणाची भूमिका पुढीलप्रमाणे स्त्री साक्षरता, मुलींच्या शिक्षणावर विशेष भर, स्त्रीयांकरीता विविध महत्त्वकांक्षी योजना, स्त्रीयांकरीता उच्च शिक्षणातील योजना, स्त्रीयांकरीता सामाजिक न्याय विभागातील योजना यांचा समावेश आहे.*

**प्रस्तावना :**

भारताची संस्कृती ही जगातील प्राचीन संस्कृतीपैकी एक आहे. मुल्ये, कुटूंबव्यवस्था, स्त्रीला प्राचीन काळापासून मिळणारा मानसन्मान हा जगाच्या दृष्टीने कुतूहलाचा विषय आहे. यत्र नार्यस्तु पुज्यते, रमन्ते तत्र देवतः असे सुभाषित आपल्याकडे आहे. गार्गी, मैत्रेयी सारख्या प्राचीन काळातील विदुषीपासून ते राणी लक्ष्मीबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले ते अलीकडच्या काळातील प्रतिभाताई पाटील, सुनिता

विल्यम्स, मेरी कोम, लता मंगेशकर अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील महिलांनी आपल्या कर्तृत्त्वाची चुणूक जगाला दाखवून दिली आहे. असे असतानाही देशात अग्रेसर असलेल्या महाराष्ट्रात स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल ढासळतो आहे ही चिंतेची बाब आहे. सुदृढ, निरोगी समाजाच्या जडणघडणीसाठी स्त्री-पुरुष प्रमाणाचा समतोल नैसर्गिकरित्या राखणे आवश्यक आहे. मात्र अलिकडच्या काळात अत्याधुनिक तंत्राज्ञानाच्या माध्यमाचा चुकीचा वापर करून हा समतोल कृत्रिमरित्या ढासळवला जात आहे.

**महाराष्ट्रातील लिंगगुणोत्तराबाबत वस्तुस्थिती :**

राज्याच्या २००२ च्या मानव विकास अहवालाप्रमाणे आपल्याला 'मुलगाच हवा' ही भावना महाराष्ट्रात प्रबळ आहे. अभ्यासाअंती या अहवालात २७ टक्के महिलांना मुलींपेक्षा मुलगेच हवे असल्याचे तर ८४ टक्के महिलांना आपल्याला केवळ मुलगा असावा असं वाटत असल्याचं नमुद करण्यात आले.

**राज्यातील १९९१ ते २०११ लिंग गुणोत्तर**

एक हजार पुरुषांमागे महिला

| **वर्ष** | **एकूण** | **ग्रामीण** | **शहरी** |
|---|---|---|---|
| | | | |
| १९९१ | ९३४ | ९७२ | ८७५ |
| | | | |
| २००१ | ९२२ | ९६० | ८७३ |
| | | | |
| २०११ | ९२५ | ९४८ | ८९९ |
| | | | |

**० ते ६ वयोगट एक हजार मुलांमागे मुली**

| **वर्ष** | **एकूण** | **ग्रामीण** | **शहरी** |
|---|---|---|---|
| | | | |
| १९९१ | ९४६ | ९५३ | ९३४ |
| | | | |
| २००१ | ९१३ | ९१६ | ९०८ |
| | | | |
| २०११ | ८८३ | ८८० | ८८८ |
| | | | |

या आकडेवारीचा अभ्यास केला तर असे दिसून येते की, १९९१ ते २०११ या कालावधीत महिलांच्या प्रमाणात दर हजार पुरुषांमागे ९३४ वरून ९२५ इतकी घट झाली आहे तर शून्य ते सहा या वयोगटात याच कालावधीत १ हजार मुलांमागे ९४६ वरून ८८३ इतकी मुलींची लक्षणीय घट झाली आहे. ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींच प्रमाण अभ्यासले तर शहरी भागातील मुलींपेक्षा ग्रामीण भागातील मुलींच प्रमाण कमी आहे.

राज्यात सर्वात वाईट परिस्थिती मराठवाड्यातील बीड जिल्ह्याची आहे. या जिल्ह्यात सध्या हे प्रमाण फक्त ८०१ इतके घसरलेले आहे. पुणे-मुंबईतही हे प्रमाण कमीच आहे. त्यामानाने सर्वच बाबतीत मागासलेला अशी ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात मुला-मुलींचे प्रमाण हजारी ९५६ इतके आहे. मुलींचे दरहजारी मुलांमागे प्रमाण वाढण्याची गरज आहे. आणि हे प्रमाण नैसर्गिक पातळीवर आणून ठेवायचे असेल तर कायद्याच्या कडक अंमलबजावणी बरोबरच लोकांचे प्रबोधन करून गर्भलिंग निदान रोखण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) संशोधनाद्वारे महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराबाबतची वस्तुस्थिती अभ्यासणे.

२) संशोधनाद्वारे स्त्री-भ्रूण हत्या रोखण्याबाबत शासनाने केलेले प्रयत्न व कायदे अभ्यासणे.

३) संशोधनाद्वारे स्त्री-भ्रूण हत्या रोखण्याबाबतशिक्षणाची भूमिका अभ्यासणे.

**कार्यपद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकानेगुणात्मक संशोधनातील दस्ताऐवज पृथ:करण पद्धतीचा अवलंब केला आहे.

**माहिती संकलनाची साधने :**

स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधनाबाबत महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागाचे अहवाल, महिला व बालविकास विभागाचा अहवाल, आरोग्य विभागाच अहवाल, कायदा व सामाजिक न्याय विभागाचा अहवाल, कड्ढदद्मद्व डड्ढद्रदृद्धद्य,शासकीय संकेतस्थळांवरील माहिती, विविध पुस्तके, मासिके व नियतकालीके यांचा माहिती संकलनाची साधने म्हणून उपयोग करण्यातआला आहे.

**शासनाच्याउपाययोजना :**

अलीकडच्याकाळात शासनासमवेत अनेक स्वयंसेवी संस्था सक्रियपणे स्त्री-भ्रूण हत्या थांबविण्यासाठी योगदान देताना दिसत आहेत. महिलांना सन्मानाने जगता यावे, त्यांना आपले कर्तृत्त्व सिद्ध करण्याची पुरेपूर संधी मिळावी या दृष्टीने शासनाने अनेक पावले उचलली आहेत.

महाराष्ट्र शासनानेदेशात पहिल्यांदा १९९४ साली महिला धोरणाची अंमलबजावणी केली. २००१ मध्ये नवीन महिला धोरण तयार करण्याच्या कामाला वेग आला. महिलांना आर्थिक तसेच सामाजिक दृष्ट्या सक्षम बनविल्यास त्यांना समाजात मानसन्मान आणिप्रतिष्ठा प्राप्तकरूनदिल्यास या समस्येवर प्रभावीपणे मात करता येईल. महिला सक्षमीकरणाचे अनेक मार्ग शासनाने उपलब्धकेले आहेत.

१) शासकीय सेवेमध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांना शासकीय कामासाठी एस.टी ने

मोफत प्रवासाची सुविधा देण्यात आली. जिल्हा परिषदांमार्फत व्यवसाय प्रशिक्षण, समुपदेशन केंद्रे, मोफत कायदेशीर सल्ला, शिलाई मशीनचे वाटप, कार्यशाळा इ. योजना राबविल्या जात आहेत.

२) राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियमाची अंमलबजावणी होत आहे. यामध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीने समान मजुरी, औषधोपचाराची सोय, दुखापत होवून हातापायाला प्लॅस्टर लावले असल्यास त्या कालावधीकरीता मजुरीची निम्मी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात येते. तीन वर्षाखालील मुलांना सांभाळण्यासाठी दाई ची व्यवस्था, काम करताना अपंगत्व आल्यास अपंगत्त्वाच्या प्रमाणानुसार किंवा जास्तीज जास्त ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येते. प्रसुतीपूर्व कालावधीसाठी सानुग्रह अनुदान दिले जाते.

३) महिला बचत गटांना ४ टक्के कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यासोबतच बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर बाजारपेठ मिळावी म्हणून तज्ज्ञ बाजारपेठ संस्थेची नियुक्ती, तसेच विविध देशातील हस्तकौशल्याच्या वस्तू शिकण्यासाठी बचत गटांचे परदेश अभ्यासदौरे ग्रामविकास विभागातर्फे आयोजित केले जातात.

४) राज्यात हुंडा प्रतिबंधककायदा १९६१ ची अंमलबजावणी होत आहे. त्याअंतर्गत सर्व गुन्हे दखलप्रात्र आहेत. या गुन्हांसाठी अटकपूर्व जामीन मिळत नाही.

५) कामाच्या ठिकाणी महिलांच्या होणा-या लैंगिक छळास प्रतिबंध करण्यासंदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ मधील तरतुदीनुसार लैंगिक छळवणूक हे गैरवर्तन मानले असून कार्यालयाच्या ठिकाणी महिलेची लैंगिक छळ होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्यास संबंधित अधिकारी/कर्मचा-या विरुद्धशिस्तभंगाचीकारवाई करण्यात येईल. प्रत्येक कार्यालयात महिला तक्रार निवारण समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत.

६) महिला आणि बालकांचा अनैतिक कारणासाठी होणारा मानवी व्यापार थांबविण्यासाठी राज्यात अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ ची अंमलबजावणी होत आहे. त्या अंतर्गत प्रशिक्षण, समुपदेशन, वैद्यकिय सुविधा, अन्न, वस्त्र, निवा-याची सुविधा देण्यात येणे.

७) राज्यातकौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५ अन्वये स्त्रियांना घरगुती काळापासून संरक्षण देणे, महिलेचा घरात राहण्याचा हक्क अबाधित राखणे, महिलेला घरात सन्मानाची वागणूक मिळावी, न्यायाची वागणूक मिळावी यासाठी

कायदेशीर उपाययोजना आहेत. कौटुंबिक हिंसाचार हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा ठरविण्यात आला आहे.

**स्त्री-भ्रूणहत्या रोखण्यासाठीकायदे :**

मुलींचा जन्मदर कमी होण्यामागे बदलत चाललेली मानसिकता आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भाचे लिंग निदान करून स्त्री-भ्रूणहत्येचे वाढलेले प्रमाण यामुळे चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली आहे. हा मुलींचा जन्मदर असाच घटत राहिला तर सामाजिक संतुलन बिघडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब विचारात घेवून शासनाने कायद्याचा आधार घेतला आहे. केंद्रशासनाने प्रसवपूर्व निदान तंत्राच्या दुरुपयोगाला आळा घालण्याच्या तसेच स्त्रीलिंगी गर्भाची हत्या थांबविण्याच्या उद्देशाने २० सप्टेंबर १९९४ पासून संपूर्ण देशभर प्रसवपूर्व निदान तंत्र दुरुपयोग प्रतिबंध अधिनियम लागू केला. महाराष्ट्रात हा कायदा १९८८ मध्येच लागू करण्यात आला.

१) या कायद्यान्वये शासनमान्य संस्थांकडून काही विशिष्ट अटींवरच उदा. गर्भवती महिलेचे पूर्वी अचानक गर्भपात झाले असल्यास, महिलेचे वय ३५ पेक्षा अधिक असेल, जंतूदोषाचा परिणाम कुटूंबात एखाद्यात मानसिक व शारीरिक व्यंग असल्यास प्रसवपूर्व निदान करता येते.

२) कायद्याचा भंग केल्यास व आरोप सिद्ध झाल्यास ज्या संस्थेमध्ये निदान केले त्या संस्थाप्रमुखास व तिथे नोकरी करणाचा मानसेवी तत्त्वावर काम करणा-या व्यक्तीस तीन वर्षांची कारावासाची व १० हजार रुपये दंडाची शिक्षा होवू शकते. तर नंतर प्रत्येक गुन्ह्यासाठी ५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा व ५० हजार रुपयांचा दंड होऊ शकतो.

३) गुन्हेगार नोंदणीकृत वैद्यकिय अधिका-याची नोंदणी प्रथमतः ५ वर्षासाठी तर दुस-या वेळेस नेहमीसाठी नोंदणी रद्दकरण्याची येईल.

४) प्रसवपूर्व लिंगनिदान तंत्राचा दुरुपयोग होवू नये म्हणून तालुका जिल्हा राज्य पातळीवर दक्षता समित्यांची स्थापना करण्यात आली.

५) सोनोग्राफीकेंद्रात गर्भलिंग चाचणी येथे केली जात नाही याचा बोर्ड लावणे बंधनकारककेले आहे.

स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठीकायदा आहे. शिक्षेची तरतूद आहे. या कायद्यान्वयेसोनोग्राफी आणि गर्भपातकेंद्रावर बंधने घालण्यात आली. कायद्याची कडक अंमलबजावणी केल्याशिवाय स्त्री-भ्रूण हत्या थांबणार नाही. त्या जोडीला समाजाची मानसिकता बदलण्यासाठीही प्रयत्न हेताना दिसून आहेत. शासनासोबतच अनेक स्वयंसेवी संस्था सक्रियपणे याला पाठींबा देतानादिसून येतात.

१) राज्यात ब-याच जिल्ह्यांमध्ये ‘लेक वाचवा’ अभियान राबविले जात आहे. त्या अंतर्गत ज्या घरात मुलगी जन्माला आली त्या मातेचा सत्कार, डोव्हाळ जेवण, समारंभ पूर्वक बाळंतविडा पाठविणे, प्रत्येक घरावर सेव्ह गर्ल अभियानाचे स्टिकर्स लावणे, भिंतीवर लेक वाचवा या अभियानातील म्हणी लिहिणे या बाबी होताना दिसून येतात.

२) यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने ‘जागर जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकिंचा’ या पाच वर्षीय उपक्रमाचे आयोजन केले आहे. या अंतर्गत सावित्रीबाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ते पुणे अशी पदयात्रा काढण्यात आली. यादरम्यान स्त्री-भ्रूण हत्या करू नका असा संदेश देणारे अनेक उपक्रम सादर झाले.

**स्त्री-भ्रूण हत्या प्रतिबंधशिक्षणाची भूमिका :**

राज्याच्या २००२ च्या मानव विकास अहवालाप्रमाणे आपल्याला ‘मुलगाच हवा’ ही भावना महाराष्ट्रात फार प्रबळ आहे. अभ्यासाअंती या अहवालात २७ टक्के महिलांना मुलींपेक्षा मुलगेच हवे असल्याचे तर ८४ टक्के महिलांना आपल्याला मुलगा असावा असं वाटत असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. या हव्यासापोटीच मुलांच्या तुलनेत मुलींची संख्या घटताना दिसत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तराचे प्रमाण पाहिले तर दर एक हजार पुरुषांमागे ९२५ महिला आहेत. ग्रामीण भागात महिलांचे हे प्रमाण ९४८ इतके तर शहरी भागात हे प्रमाण ८९९ इतके आहे. त्याचप्रमाणे ० ते ६ वयोगटातील मुला-मुलींचं प्रमाण अभ्यासलं तर आपल्याला दिसून येतं की हे प्रमाण एक हजार मुलांमागे ८८३ मुली इतके कमी आहे. यामध्ये ग्रामीण भागाचं प्रमाण ८८० तर शहरी भागाचं प्रमाण ८८८ इतकं आहे. म्हणजे महिलांच्या बाबतीत शहरी भागात प्रमाण कमी आहे तर ० ते ६ वयोगटात मुलींचे ग्रामीण भागात प्रमाण कमी आहे. या संदर्भात शिक्षणाची भूमिका पुढीलप्रमाणे.

**१) स्त्री साक्षरता :**

२०११ च्या जनगणनेनुसार राज्याची साक्षरतेची टक्केवारी ८२.९१ टक्के इतकी आहे. यामध्ये ग्रामीण भागाचे प्रमाण ७७.०९ तर शहरी भागाचे प्रमाण ८९.८४ टक्केइतके आहे. यात महिलांचे एकूण साक्षरतेचे प्रमाण ७५.४८ टक्के असून, त्यात ग्रामीण महिलांचे प्रमाण ६७.३८ आणि शहरी महिलांचे प्रमाण ८५.४४ टक्के इतके आहे. ग्रामीण भागातील मुलींच्या किंवा स्त्री साक्षरतेकडे अजूनही गांभीर्याने बघण्याची गरज असल्याचे या आकडेवारीवरूनदिसून येते.

**२) मुलींच्या शिक्षणावर विशेष भर :**

ग्रामीण भागात मुलींना शाळेत पाठविण्याबाबत असमानता दिसून येते. ही असमानता अनुसूचित जाती आणि जमातीच्या बाबतीत विशेषतः उच्च प्राथमिक स्तरावर अधिक तीव्र असल्याचे राज्याच्या २०१०-२०११ च्या आर्थिक पाहणी अहवालात नमूद करण्यात आले आहे. राज्यामध्ये प्राथमिक आणि उच्च प्राथमिक स्तराकरीता स्त्री-पुरुषअसमानतानिर्देशांक २००९ प्रमाणे अनुक्रमे ०.८९ आणि ०.८८ इतका आहे. यामागे दारिद्र्य, घरगुती/भावंडांच्या जबाबदा-या, स्त्री बाल कामगार, शिक्षणापेक्षा मुलीच्या लग्नास प्राधान्य यासारखी कारणे दिसून येतात. ही बाब लक्षात घेऊन शासनाने मुलीच्या शिक्षणावर विशेष भर दिला आहे. राज्यात

मुलींना १२ वीपर्यंत मोफत शिक्षण देण्याचा निर्णय वरदान ठरत आहे. राज्यात फक्त मुलींसाठी १९९८ प्राथमिक, ९२५ माध्यमिक आणि २८५ उच्च माध्यमिक शाळा आहेत. साखरशाळा, वसतिशाळासारखे नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून स्थलांतरीत कामगारांच्या/मजुरांच्या मुलांप्रमाणे मुलींच्या शिक्षणांच्या संधीचाही विस्तार करण्यात आली आहे. ६ ते १४ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना जवळच्या शाळेत मोफत व सक्तीचे शिक्षण प्राप्त करून देणारा 'मोफत व सक्तीचे शिक्षणाचा अधिकार २००९' अधिनियमही राज्यात लागू आहे.

**३) स्त्रीयांकरीता महत्त्वकांक्षी योजना :**

मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी अन्य काही महत्त्वाकांक्षी योजनाही शासनामार्फत राबविण्यात येत आहेत. यामध्ये मुलींच्या प्राथमिक स्तरावरील शिक्षणासाठी राष्ट्रीय कार्यक्रम, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, उपस्थिती भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर मोफत पास योजना यासारख्या योजनांचा समावेश आहे. राज्यात मुलींसाठी ४ सैनिकी शाळा आहेत. याशिवाय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण, १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश आणि लेखन साहित्य, आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत योजना देखील शासनामार्फत राबविण्यात येते. जिल्हा परिषदांनी त्यांच्या स्व उत्पन्नातील १० टक्के निधी महिला व बालविकासावर खर्च करणे बंधनकारक करण्यात आले असून, यामध्ये मुली तसेच महिलांच्या विकासाच्या विविध योजना राबविल्या जातात. इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत शिकणा-या आणि लांब शाळा असणा-या मुलींना मोफत सायकली, मध्यान्ह भोजन, आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलांना मोफत शिलाई मशिन, रोगनिदान, शिबीरांचे आयोजन, अंगणवाड्या-बालवाड्यांना शालेय साहित्य पुरवठा गणवेश वाटप, मुलींना व्यवसाय व तंत्र प्रशिक्षण, मुलींसाठी- महिलांसाठी समुपदेशन, मोफत कायदेशीर सल्लाही देण्यात येतो.

**४) स्त्रीयांकरीता उच्च शिक्षणातील योजना :**

शालेय शिक्षण विभागाप्रमाणेच उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फतही मुलींच्या शिक्षणासाठी विविध योजना राबविण्यात येतात. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनामधील ३० टक्के जागा मुलींसाठी राखून ठेवण्यात आल्या आहेत. मुलींसाठी शासकीय तसेच स्वयंसेवी संस्थांची वसतिगृहेही योजनाही विभागामार्फत राबविण्यात येते. सामाजिक समता आणि स्त्री शिक्षण तसेच कमकुवत गटातील मुलामुलींचे शिक्षण या क्षेत्रात चांगले काम करणा-या सहा महसूल विभागातील महिलांना सावित्रिबाई फुले पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. राज्यात मुलींसाठी १५ औद्योगिक प्रशिक्षण संस्था असून, उर्वरित औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काही व्यवसाय अभ्यासक्रम खास मुलींसाठी राखून ठेवण्यात आले आहेत. मुलींसाठी अनुदानित महिला महाविद्यालयेही राज्यात स्थापन झालेली असून, नाथीबाई ठाकरसीसारखे महिला विद्यापीठही राज्यात कार्यरत आहे.

**५) स्त्रीयांकरीता सामाजिक न्याय विभागातील योजना :**

अल्पसंख्याक विभाग तसेच सामाजिक न्याय विभागामार्फत त्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी अनेक योजना राबविल्या जातात. यामध्ये पटसंख्या वाढविण्यापासून उपस्थिती भत्ता, शिष्यवृत्या, फी सवलत, शालेय साहित्य पुरवठा, व्यवसाय तसेचतंत्र शिक्षणासाठी, उच्च शिक्षणासाठी वसतिगृहांसारख्या सुविधा आणि सवलती यांचा समावेश आहे.

**समारोप :**

स्त्री-भ्रूण ते महिला असा महिलांचा प्रवास होत असताना जन्माला येण्याच्या हक्कापासून आर्थिक स्वावलंबन, समानता आणि सामाजिक संरक्षणाच्या बाबतीत बहुआयामी अशा योजना आखून शासनाने महिलांच्या पंखात अमाप बळ देण्याचं महत्त्वाचं काम केल्याचं आपल्याला लक्षात येत. शासनाच्याविविधविभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजनांचा आढावा घेतला तर शासन महिला आणि मुलींच्या मागे खंबीरपणे उभे असल्याचे, महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे दिसून येते. महाराष्ट्राला समृद्ध लोकपंरपरेचा
वारसा लाभला आहे. 'ल्योकापरीस लेक कशानं उणी झली, आई-बापाला ववी गाता, कैलासी ऐकू गेली.' असं म्हणणा-या आपल्या आया-बहिणींनी आपल्याला विचाराचं खूप चांगलं संचित दिलं आहे. हे संचित जपू या. मुलीच्या जन्माचं स्वागत करताना आपल्या आसपास होणा-या स्त्री-भ्रूणहत्या थांबविण्यासाठी कायद्याच्या अंमलबजावणीबरोबर आपण प्रत्येक जण सहकार्य करू या. आपली भावी पिढी संरक्षित करताना या छकुल्यांच्या जन्माचा जामीन होण्याची शपथ आपण यानिमित्ताने प्रत्येक जण घेऊ या!

**संदर्भ :**

*मुळे, सुरेखा (२०११) **'तिला वाचवा...भविष्य घडवा'**, लोकराज्य, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन.*
*चंद्रसेन, तुरकर (२०११) '**महिला कायदे व अधिकार'**, युनिसेफ महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन.*
*गायकवाड, वर्षा (२०११) **गर्भजल परिक्षण अधिनियम अहवाल,** महिला व ग्रामविकास मंत्रालय, महाराष्ट्र शासन.*
*फैजिया खान (२०११) **स्त्री-भ्रूण हत्या संदर्भात आरोग्य विभागाचा अहवाल,** आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन.*
*www.savethebabygirl.com*
*www.censusofindia.2011*
*www.amchimulgi.com*